# **प्रसिद्धिपत्रक**

**महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी टंकलेखन परीक्षेची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे :-**

**१. भाषा संचालनालयाची मराठी टंकलेखन परीक्षा**

इंग्रजी टंकलेखनाचे काम करणारे टंकलेखक, लिपिक-टंकलेखक, इंग्रजी लघुटंकलेखक व इंग्रजी लघुलेखक यांच्यासाठी **मंगळवार, दिनांक २१ एप्रिल, २०२६** रोजी मराठी टंकलेखन परीक्षा मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय ठिकाणी घेण्यात येईल. मराठी टंकलेखन परीक्षा संगणकावर घेण्यात येणार असून ती ३० श.प्र.मि.गतीची असेल. यासाठी आय.एस.एम. (ISM V६) सॉफ्टवेअरमध्ये DVOT-SurekhMR हा फॉंट टंकलेखनासाठी वापरण्यात येईल. संगणकाची व्यवस्था परीक्षा केंद्रावर भाषा संचालनालयामार्फत करण्यात येईल.

मराठी टंकलेखन परीक्षेसाठी आवेदनपत्र कार्यालय प्रमुखांमार्फत पाठवावे. **परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी सदर आवेदनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव, कार्यालयाचा पूर्ण पत्ता (पिन कोड क्रमांकासह ) मोबाईल क्रमांकासह आवेदनपत्र परिपूर्ण भरून मूळ चलनासह दि. १८ मार्च, २०२६ पर्यंत खाली नमूद केलेल्या संबंधित कार्यालयांकडे विहित मुदतीत पाठविणे आवश्यक आहे.** तसेच या परीक्षेची कार्यक्रमपत्रिका परीक्षेपूर्वी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

## **विभागीय कार्यालयांचे पत्ते**

**मुंबई व कोकण विभाग**
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
कोकण भवन, ३ रा मजला,नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५७३५४२

**पुणे व नाशिक विभाग**
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत,२ रा मजला, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२०-२६१२१७०९

**नागपूर व अमरावती विभाग**
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
प्रशासकीय इमारत क्र.१, २ रा मजला,
सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६४९५६

**छत्रपती संभाजीनगर विभाग**
सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,
जुने जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर,
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३६१३७२

**भाषा संचालक,**
**महाराष्ट्र राज्य.**

**ठिकाण :- मुंबई.**
**दिनांक :-** २४/२/२०२६